ISSN 2277 - 7539 (Print)
Impact Factor - 5.631 (SJIF)

# Excel's International Journal of Social Science & Humanities

An International Peer Reviewed Journal

Vol.1 No. 41
December 2025

## FORTS OF MAHARASHTRA: GLOBAL HERITAGE & TIMELESS LEGACY



**Editor**

**Dr. Ravi Subhashrao Satbhai**

Assistant Professor, Department of History
Adv. B. D. Hambarde Mahavidyalaya, Ashti
Dist. Beed, Maharashtra

# INDEX


| Sr. No. | Name | Title | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | डॉ. बाबासाहेब शेप | मराठवाड्यातील गड-किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व | 3 |
| 2 | डॉ. चित्रा सुखदेव पाटील | छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील किल्ल्यांचे प्रशासन | 6 |
| 3 | शिवाजी काशीनाथ गायकवाड | महाराष्ट्राचे किल्ले: जागतिक वारसा, कालातीत वारसा कालखंड १४६० ते १७६१ सैनिकी, वास्तुकला, रणनीती दृष्टीतून देवगिरी किल्याचे जागतिक महत्व | 9 |
| 4 | डॉ. सतिलाल आ.कन्नोर | खानदेशातील किल्ले : भौगोलिक, राजकीय व सांस्कृतिक इतिहासाचा अभ्यास | 14 |
| 5 | प्रा.डॉ किशोर वानखेडे | गाविलगड किल्ल्यावरील शिलालेख : इतिहासाचा समृद्ध वारसा | 20 |
| 6 | डॉ. गिरीधर नागोराव सोमवंशी | धाराशिव जिल्ह्यातील ऐतिहासिक पर्यटनाचे प्रमुख केंद्र - नळदुर्ग किल्ला | 25 |
| 7 | प्राजक्ता राजेंद्र चव्हाण | शिवकालीन व्यापार आणि आरमारातील किल्ल्यांचे महत्त्व | 28 |
| 8 | कु. कुंभार भाग्यश्री शामराव | छत्रपती शिवाजी महाराज आणि किल्ल्यांचा वारसा | 32 |
| 9 | शिलिन कारभारी गाडे | किल्ला पर्यटनाचा स्थानिक अर्थव्यवस्थेवर परिणाम: एक संक्षिप्त संशोधन पेपर | 36 |
| 10 | सविता विठ्ठल बागल | वर्तमानातील मावळ्यानी जागवलेला शिवरायांचा कठीणगड - तुंग | 39 |
| 11 | डॉ.महेंद्र बन्सीधर वैरागे | वारसा पर्यटन व त्याचा स्थानिक समाजावर परिणाम | 44 |
| 12 | श्री रामेश्वर तुकाराम भदाणे<br>डॉ. मनीष रघुनाथ करंजे<br>डॉ. धनंजय रमाकांत चौधरी | शैक्षणिक संस्थांची किल्ला जागरूकतेतील भूमिका | 46 |
| 13 | अमितकुमार गणेश शिंगणे | महाराष्ट्राबाहेरील मराठा वारसा: तंजावरचा किल्ला आणि सरफोजी राजे भोसले (दुसरे) यांचे सांस्कृतिक योगदान | 50 |
| 14 | डॉ. रघुनाथ धनालाल चौधरी | शिवकालीन जलदुर्गनिती | 55 |
| 15 | श्वेता संजय फटे | महाराष्ट्रातील किल्ले : जागतिक वारसा, चिरंतन परंपरा | 59 |
| 16 | प्रा.डॉ.माधवी महाके | प्राचीन भारतीय निवडक लिखित स्रोतातील दुर्गोल्लेख व ऋग्वेद संहितेतील प्रभुत्व प्राप्तीसाठी केलेला दुर्गोध्वंस : ऐतिहासिक ऊहापोह | 63 |
| 17 | प्रा. डॉ. अनंत दादाराव मरकाळे | शिवकाळात किल्ल्यांचे राजकीय महत्त्व | 67 |
| 18 | प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम | महाराष्ट्रातील किल्ल्यांचा ऐतिहासिक विकास | 70 |
| 19 | संगीता निवृत्ती पाटील | पन्हाळा किल्ल्याचा ऐतिहासिक आढावा | 75 |
| 20 | श्रीमाला के.जी. | उदगीर किल्ल्याच्या स्थापत्य रचनेचा अभ्यास | 79 |

# छत्रपती शिवाजी महाराज आणि किल्ल्यांचा वारसा

**कु. कुंभार भाग्यश्री शामराव**
संशोधक विद्यार्थिनी,
सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे
ई मेल आयडी:bhagyashreekumbhar10@gmail.com

**सारांश**

छत्रपती शिवाजी महाराज हे भारतीय इतिहासातील अद्वितीय राज्यकर्ते असून त्यांच्या स्वराज्य स्थापनेत किल्ल्यांनी केंद्रस्थानी भूमिका बजावली. महाराजांनी केवळ किल्ले जिंकले नाहीत, तर त्यांचा योजनाबद्ध विकास, संरक्षणात्मक पुनर्रचना आणि प्रशासकीय उपयोग करून किल्ल्यांना स्वराज्याचे कणा बनविले. सह्याद्री पर्वतरांगांतील डोंगरी किल्ले, किनारी सागरी किल्ले आणि अंतर्गत मैदानी किल्ले यांचा समन्वय साधत त्यांनी एक प्रभावी लष्करी व प्रशासकीय जाळे उभारले. शिवाजी महाराजांच्या किल्ला-धोरणामध्ये भूगोलाचे अचूक आकलन, नैसर्गिक संरक्षणाचा कुशल वापर, आणि युद्धनीतीचा प्रागतिक विचार दिसून येतो. गडावरील बुरुज, तटबंदी, प्रवेशद्वारे, पाण्याची टाकी, गुप्त मार्ग आणि साठवण व्यवस्था ही सर्व तत्त्वे दीर्घकालीन संरक्षण व स्वावलंबन यांचा विचार करून उभारलेली होती. प्रत्येक किल्ला हा केवळ लष्करी केंद्र नसून तो प्रशासकीय, आर्थिक व सांस्कृतिक केंद्र म्हणूनही कार्यरत होता.म्हणूनच या किल्ल्यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**प्रस्तावना:**

भारतीय उपखंडाचा इतिहास हा राजकीय चढउतार, सांस्कृतिक देवाणघेवाण, लष्करी विस्तार आणि संघर्ष यांच्या गुंतागुंतीतून विकसित झाला आहे. या प्रक्रियेत किल्ल्यांची भूमिका अत्यंत महत्वाची राहिली आहे. भारतातील अनेक राजघराण्यांनी किल्ल्यांचा वापर केला असला तरी छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ल्यांचे जाळे उभारून त्यांना स्वतंत्र सामरिक तत्त्वज्ञानाचे केंद्रस्थान दिले. मराठा स्वराज्याची पायाभरणी, प्रशासनाची स्थिरता, लष्करी रणनीती, व्यापारमार्गांचे संरक्षण आणि सांस्कृतिक ओळख यांमध्ये किल्ल्यांनी अतूट योगदान दिले आहे.

शत्रूच्या हल्ल्यापासून संरक्षण करण्यास सुलभ जावे आणि आसपासच्या प्रदेशावर नियंत्रण ठेवता यावे म्हणून बांधलेल्या वास्तूचा इंग्रजीत फोर्ट (Fort), कॅसल (Castle), सिटॅडल (Citadal), बर्ग (Burgh) इ. संज्ञांनी उल्लेख होतो तर मराठीत दुर्ग, गिरिदुर्ग, किल्ला, द्वीपदुर्ग, जंजिरा, गढी, कोट, बालेकिल्ला इ. संज्ञांनी या वास्तूचे निरनिराळे प्रकार दर्शविले जातात.[1] महाराष्ट्र हा डोंगरांचा देश, दुर्गांचा देश. गोविंदाग्रजांनी महाराष्ट्राचे वर्णन कसे केले आहे?

'राकटदेशा, कणखरदेशा, दगडांच्या देशा
नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याही देशा'

अशा या राकट देशाचा प्रतिनिधी म्हणजे सह्याद्री. सह्याद्रीत कोठेही उभे राहून नजर फिरवली तर, दर चार-दोन शिखरांआड एखादं शिखर तटबुरुजांचं शेला-पागोटे चढवून उभं राहिलेलं आढळतं. यातील बहुतेक दुर्गांनी श्रीशिवछत्रपतींची चरणधूळ आपल्या मस्तकी धारण केली आहे. त्या शिवस्पर्शानं पावन झालेली ही महाराष्ट्राची धारातीर्थे आहेत. या गड-कोट-किल्ले अन् दुर्गांमधून इये देशीचे पुत्र ताठ मानेने वावरले आहेत. या बळींवंत दुर्गांच्या आधारावरच शिवरायांनी परकीय, आक्रमक, धर्मांध सत्ताधीशांना नामोहरम केलं.[2] या संशोधन निबंधाचा उद्देश म्हणजे महाराष्ट्रातील किल्ल्यांचा विकासक्रम शोधणे, त्यातील विविध टप्प्यांचा अभ्यास करणे, प्रत्येक कालखंडातील वैशिष्ट्ये ओळखणे होय.

**बीजशब्द:** किल्ले स्थापत्य, गड–दुर्ग व्यवस्थापन, किल्ल्यांचे राजकीय व लष्करी महत्त्व, शिवकालीन प्रशासन.

**उद्दिष्टे:**

1) छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ला व्यवस्थेचे तत्त्वज्ञान अभ्यासणे.
2) शिवकालीन किल्ल्यांची वास्तुरचना, उपयोग आणि संरक्षण प्रणालीचे विवेचन करणे.
3) छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील किल्ल्यांचे महत्त्व अभ्यासणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी करताना प्रामुख्याने प्राथमिक व दुय्यम साधनांचा आधार घेऊन ऐतिहासिक, वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब केलेला आहे.

**किल्ल्यांचा इतिहास**

इतिहासामध्ये अगदी प्राचीन कालापासूनच किल्ल्यांना अनन्यसाधारण महत्व असल्याचे दिसून येते. ऋग्वेदामध्ये किल्यांचा उल्लेख 'पूर' या शब्दाने केला जाई. सिंधू संस्कृतीमध्ये हडप्पा शहराला तटबंदी व बालेकिल्ला असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र हे भारताच्या इतिहासातील एक विशेष स्थान राखणारे राज्य आहे. या भूमीवर राजकीय, सांस्कृतिक आणि लष्करी दृष्ट्या अनेक परिवर्तनांचे साक्षीदार म्हणून किल्ले (Forts) उभे आहेत. सह्याद्रीच्या कड्यावर, कोंकणाच्या किनाऱ्यावर, दऱ्या-खोऱ्यांत, पठारांवर उभारलेले हे किल्ले केवळ दगड-विटांचा संच नाहीत, तर त्या मागे आहे मराठा सामर्थ्य, स्थापत्यकौशल्य, रणनीती आणि सांस्कृतिक आत्मविश्वासाचा इतिहास.

किल्ल्यांचा विकास हा महाराष्ट्राच्या ऐतिहासिक प्रवासाशी घट्ट जोडलेला आहे. सातवाहन, राष्ट्रकूट, यादव, बहमनी, आदिलशाही, निजामशाही आणि अखेरीस मराठा साम्राज्य या सर्व राजवटींनी त्यांच्या काळात वेगवेगळ्या प्रकारचे किल्ले बांधले, सुधारले आणि वापरले. त्यामुळे प्रत्येक काळातील स्थापत्यशैली, तंत्रज्ञान, संरक्षण पद्धती आणि प्रशासनिक दृष्टिकोन यांचे दर्शन या किल्ल्यांतून घडते. उदाहरणार्थ, दगडी तटबंदी व बुरुज असलेले राजगड, रायगड, प्रतापगड, सिंहगड हे मराठा कालीन किल्ले; तर देवगिरी (औरंगाबाद) किंवा दौलताबाद हे मध्ययुगीन काळातील अद्वितीय दुर्ग म्हणून ओळखले जातात.

महाराष्ट्रातील किल्ल्यांचा ऐतिहासिक विकास हा केवळ स्थापत्य किंवा युद्धकलेचा इतिहास नाही, तर तो राजकीय बदल, सामाजिक उत्क्रांती आणि सांस्कृतिक समरसतेचा प्रतिबिंब आहे. या किल्ल्यांच्या माध्यमातून राज्यातील विविध भूभाग, प्रादेशिक संस्कृती, लोकजीवन आणि धर्मसंवाद यांचा मागोवा घेता येतो. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ल्यांचा जो रणनीतिक वापर केला, त्याने किल्ल्यांना स्वराज्याच्या स्थापनेत आणि राष्ट्रीय ओळखीच्या निर्मितीत केंद्रस्थानी स्थान दिले. आज या किल्ल्यांचे अवशेष महाराष्ट्राच्या वैभवशाली भूतकाळाची साक्ष देत उभे आहेत. त्यांच्या विकासाचा अभ्यास केल्यास राज्याच्या राजकीय इतिहासाची दिशा, लष्करी व्यवस्थेचा विकास, तसेच सांस्कृतिक व स्थापत्य परंपरेचा वारसा स्पष्ट दिसून येतो. त्यामुळे महाराष्ट्रातील किल्ल्यांचा ऐतिहासिक वारसा हा विषय इतिहासशास्त्र, पुरातत्त्व, आणि सांस्कृतिक अभ्यास या सर्व क्षेत्रांसाठी महत्त्वाचा ठरतो.

**छत्रपती शिवाजी महाराज यांचा किल्ल्यांचा वारसा**

मध्ययुगीन किल्ल्यांच्या बाबतीत किल्ल्यांचे दोन प्रकार दिसून येतात. त्यामध्ये

1. शिवपुर्वकालीन किल्ले
2. शिवकालीन किल्ले

मराठा काळात डोंगरी किल्ले (गिरिदुर्ग) मोठ्या प्रमाणात बांधले गेले. किल्ल्याच्या स्थानावरून आणि बांधणीच्या पद्धतीवरून 'अभिलाशितीर्थ चिंतामणी' या ग्रंथाचा कर्ता सोमेश्वर देव यांनी किल्ल्याचे 9 प्रकार पाडलेले आहेत. 'शिवतत्त्व रत्नाकर 'या ग्रंथात बसवराज यांनी किल्ल्याचे 8 प्रकार सांगितलेले आहेत. शिवाजी महाराजांनी राज्याभिषेका नंतर रघुनाथपंथ हणमंते यांच्याकडून 'राज्यव्यवहार कोश' नावाचा कोश तयार करून घेतला.त्यात 'वनदुर्ग' म्हणून एक स्वतंत्र प्रकरण सव्वीस श्लोकांचे आलेले आहे. त्यात किल्ल्यांचे तीन प्रकार सांगितलेले आहेत.

1. गिरिदुर्ग किंवा डोंगरी किल्ला
2. भुईकोट किल्ला
3. द्वीपदुर्ग किंवा जंजिरा [3]

किल्ल्याचे वर्णन करत असताना प्र. के. घाणेकर आपल्या शिवरायांचे दुर्गकारण मध्ये म्हणतात,

संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग .... गडकोट हेच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे सैन्याचे बल, गडकोट म्हणजेराज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपली वसतिस्थळे, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार, किंबहुना गडकोट म्हणजे आपले प्राणसंरक्षण गडोगडी गडकोटसंरक्षणाचे कार्य फार नाजूक तनखा (शरीरावश्यक वस्तू), दास्तान (धान्यधुन्य इ.), इस्ताद

(युद्धसामुग्री) आदिकरून गडाच्या प्रयोजनाची वस्तुजात गडास संग्रह करून ठेवावेच लागते. या विरहित गड म्हणजे आपले कार्याचे नव्हेत. असे बरे समजून आधी लिहिले प्रमाणें उस्तवारी गडाची करावी….[4]

मध्ययुगीन काळाची गरज लक्षात घेता छत्रपती शिवाजी महाराजांनी सह्याद्रीच्या कडे कपारीत किल्ले बसविले. या किल्ल्यांचे शत्रूपासून संरक्षण व्हावे राज्याचे व किल्ल्यांचे देखील संरक्षण व्हावे या दृष्टीने किल्ल्यांचा बंदोबस्त चांगल्या रीतीने करणे महत्त्वाचे होते त्यासाठी किल्ल्याची स्थळ निश्चिती करणे महत्वाचे होते. याच संदर्भात डॉ. एस. एन. सेन म्हणतात. 'the sites wear generally well selected. Raigad could be reached by one narrow steep and difficult footpath that zigzagged along an inaccessible precipice and every care had been taken to provide for its defence.'[5]

## शिवकालीन किल्ल्यांची वैशिष्ट्ये

शिवाजी महाराजांचे स्वराज्य केवळ किल्ल्यांच्या आधारानेच आकारास आले. शिवाजी महाराजांनी अनेक बांधकामे करून किल्ल्यांना सामर्थ्य प्राप्त करून दिले. किल्ल्या आक्रमण करून लढवन्या पेक्षा किल्ल्याचे संरक्षण महत्वाचे होते व त्या दृष्टीनेच किल्ल्यांची उभारणी केली जात असे. शिवकालीन किल्ल्यांच्या बांधकामाची वैशिष्ट्ये प्रामुख्याने स्थळ निश्चिती, जलसंचय, दरवाजा, तटबंदी, निवास स्थाने, बालेकिल्ला, दैवते, किल्ल्यावरील इमारती, दारूखाना, अंबरखाना यासारख्या वास्तू होत. जेणेकरून शत्रूपासून संरक्षण करणे ,किल्ल्यावरील अधिकारी सैनिक यांच्या शिबंदीची व्यवस्था होणे, दारुगोळा विपुल प्रमाणात उपलब्ध होणे महत्वाचे होते. या सर्व गोष्टी लक्षात घेऊनच महाराज किल्ले उभारत असत. शिवाजी महाराजांच्या काळातील किल्ल्यांची योजना अत्यंत विचारपूर्वक बनवली गेली होती. राजगड हा सुरुवातीचा राजधानी किल्ला असून नंतर रायगड हा स्वराज्याचा 'राजधानी किल्ला' बनला. रायगड हा किल्लेस्थापत्य मधील एक उत्तम नमुना आहे. रायगड किल्ल्यावरील राजसभाभवन, राजदरबार, होळीचा माळ, भगवा ध्वज फडकणारा बालेकिल्ला हे स्वराज्याच्या तेजाचे प्रतीक मानले जाते.

सभासद बखर म्हणते - "राजा खासा जाऊन पाहता गड बहुत चखोटा. चौतर्फा गडाचे कडे तासिल्याप्रमाणे दिड गाव उंच. पर्जन्यकाळी कडियावर गवत उगवत नाही आणि धोंडा तासीव एकच आहे. दौलताबाद पृथ्वीवर चखोट गड खरा, परंतु तो उंचीने थोडका. दौलताबादचे दशगुणी गड उंच असे देखोन बहुत संतुष्ट झाले आणि बोलिले, तक्तास जागा हाच गड करावा.[6]
प्रतापगड हा किल्ला अफझलखानाच्या मोहिमेत निर्णायक ठरला. सिंहगड, पन्हाळा, विशाळगड, तोरणा, जंजिरा अशा अनेक किल्ल्यांनी विविध ऐतिहासिक घटना अनुभवलेल्या आहेत. प्रत्येक किल्ल्याचे रक्षणासाठी तयार केलेले दरवाजे, उंच तटबंदी, काटकोनात बसवलेले विशाल घनदगडी दगड, नैसर्गिक दऱ्यांचा आणि घळींचा उपयोग हे सर्व शिवकालीन स्थापत्यकलेच्या उच्च गुणवत्तेचे द्योतक आहे. विशेषतः पाण्याची कमतरता टाळण्यासाठी तलाव, तळी, कोरडे विहिरी, पाण्याच्या गटारी अशा प्रणालींचा उत्तम वापर झाला. तसेच गुप्त मार्ग, पहारेकऱ्यांचे बुर्ज, अन्नधान्य साठवणूक व्यवस्था यामुळे किल्ल्यांना अनेक महिने शत्रूंपासून स्वतःचे रक्षण करता येणे शक्य झाले.

## किल्ल्यांचे महत्त्व

किल्ल्यांचे महत्त्व सांगताना स्वतः शिवाजीने एके ठिकाणी म्हटलेले आहे की, " जसा कुळंबी शेतात माळा घालून शेत राखितो तसे किल्ले राज्याच्या रक्षणासाठी आहेत. तारवास खिळे मारून बळकट करीतात तशी राज्यास बळकटी किल्ल्याची आहे. किल्ल्यांच्या योगाने औरंगशहासारख्याची उमर गुजरून जाईल. आपणास धर्मस्थापना व राज्यसंपादन करणे आहे. सर्वांस अन्न लावून त्यांचा बचाव करावयाचा आहे. दिल्लीचा बादशहा आमच्या स्वराज्याचा नाश करावयास टपला आहे. त्याची स्वारी आमच्यावर झाली तर त्याला जुनेनवे तीनशेसाठ किल्ले आहेत. एक एक मिळून तो वर्ष वर्ष लढला तरी त्यास तीनशेसाठ वर्षे लागतील ! "[7]
किल्ल्यांची रचना शत्रूला परतवून लावण्यासाठी अत्यंत रणनीतिक पद्धतीने केलेली होती. डोंगरी, समुद्री, डोंगरकडा, घाटमाथा यांवर किल्ले बांधून नैसर्गिक संरक्षणाचा उपयोग केलेला होता. किल्ल्यांच्या मध्यवर्ती जाळ्यामुळे सैन्य वेगाने एका किल्ल्यापासून दुसऱ्याकडे हलवता येत असे. प्रत्येक किल्ला स्वतःपुरता रसद, पाण्याची सोय, धान्यकोठारे, तोफा, बारूद याने सज्ज असा होता. किल्ले हे सुव्यवस्थित प्रशासनाचे केंद्र होते.कर, महसूल, न्याय, व्यापार यांची देखरेख किल्ल्यांतून केली जात असे. स्वराज्याचा विस्तार आणि मराठा सत्तेचा भू-राजकीय प्रभाव याचे मूळ किल्ल्यांत होते. किल्ले अजिंक्यतेचे, स्वाभिमानाचे आणि स्वातंत्र्याचे प्रतीक आहेत. प्रत्येक किल्ल्यावर देवदेवतांचे मंदिरे, तळी-कुंडे, दरवाजे, गुहा, गुप्त दरवाजे हे संस्कृतीचे पुरावे. किल्ले आजही मराठी अस्मिता, इतिहास आणि सामूहिक भावनांचे प्रेरणास्थान आहेत.

**निष्कर्ष:**

महाराष्ट्रातील किल्ल्यांचा इतिहास हा या भूमीच्या सांस्कृतिक, राजकीय आणि लष्करी उत्क्रांतीचा आरसा आहे. प्राचीन काळापासून ते मराठा साम्राज्याच्या गौरवशाली युगापर्यंत किल्ल्यांनी राज्यसंरक्षण, प्रशासन आणि समाजजीवन यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. सातवाहन, यादव, बहमनी, आदिलशाही व शेवटी छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील किल्ले हे केवळ संरक्षणासाठी नव्हे तर स्वराज्याची ओळख बनले. या किल्ल्यांच्या रचनांमधून स्थानिक भौगोलिक परिस्थिती, वास्तुकलेतील कौशल्य, तसेच त्या काळातील राजकीय परिस्थितीचे प्रतिबिंब दिसते. समुद्रकिनारी सिंधुदुर्ग व विजयदुर्गसारखे सागरी किल्ले, तसेच रायगड, तोरणा, राजगडसारखे डोंगरी किल्ले हे महाराष्ट्राच्या सामर्थ्याचे प्रतीक ठरले. आज हे किल्ले केवळ ऐतिहासिक स्मारक नसून, महाराष्ट्राच्या अस्मितेचे आणि स्वातंत्र्याच्या प्रेरणेचे जिवंत प्रतीक आहेत. त्यांच्या जतन, संवर्धन व अभ्यासातून पुढील पिढ्यांना आपल्या इतिहासाची ओळख आणि अभिमान मिळतो. त्यामुळे या किल्ल्यांचे संरक्षण हे फक्त वारसा जपण्याचे नव्हे, तर आपल्या सांस्कृतिक ओळखीचे रक्षण करण्याचे कार्य आहे.

शिवभारतकार कवी परमानंद याने किल्ल्याचे महत्व पुढील शब्दात व्यक्त केले आहे. "दुर्गाला केवळ दुर्ग म्हणून लोक दुर्गम मानत नाहीत तर त्याचा स्वामी असणे ही त्याची दुर्गमता. प्रभूमुळे दुर्ग दुर्गम होतो व दुर्गामुळे प्रभू दुर्गम होतो."[8]

**संदर्भ:**


1. गायकवाड, सरदेसाई, हनमाने, ऐतिहासिक कागदपत्रे व स्थळे यांचा अभ्यास, फडके प्रकाशन कोल्हापूर, 1989, पृ. क्र. 107
2. (https://marathiworld.com/gadkile#google_vignette)
3. उपरोक्त, पृ. क्र. 109
4. डॉ. जोशी, घुमरे, शिव-विजय , श्री. मंगेश प्रकाशन नागपूर 1992, पृ. क्र. 196
5. प्री. आर. डी. गायकवाड, डॉ बी एन सरदेसाई, डॉ व्ही एन हनमाने, इतिहास लेखन पद्धत व ऐतिहासिक स्मारके यांचा अभ्यास, फडके प्रकाशन कोल्हापूर, 1998,पृ. क्र. 97.
6. https://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%B0%E0%A4%BE%E0%A4%AF%E0%A4%97%E0%A4%A1_(%E0%A4%95%E0%A4%BF%E0%A4%B2%E0%A5%8D%E0%A4%B2%E0%A4%BE)
7. उपरोक्त, पृ. क्र. 120
8. प्री. आर. डी. गायकवाड, उपरोक्त, पृ. क्र. 98.



ISSN 2277-7539(Print)